दुरध्वनी क्र. २२८२१२३९
Tel.No. 22821239

फॅक्स क्र. २२८२२३१२
Fax No. 22822312

महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई- ४००००२
Government of Maharashtra
Department of Fisheries
Taraporevala Aquarium,Netaji Subhash Road, Mumbai 400002
Web:-http//fisheries.adfmaharashtra.
E-mail: commfishmaha.gmail.com

जा. क्र. मत्स्य/सा/०५३१०१/७४७/२०२२

दिनांक - ०९/०६/२०२२

# शुध्दीपत्रक

**वाचा- १. शासन आदेश क्र. मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१३७/पदुम-१४, दि.१ जुन २०१५**
**२. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा)अधिनियम, २०२१**
**३. या कार्यालयाचे समक्रमांकाचे आदेश दि.०९/०५/२०२२**

## प्रस्तावना-

मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छीमारांची जिवीत व वित्त यांचे रक्षण करण्याच्या हेतुने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ च्या कलम ४ च्या पोट- कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त कलम ३ अन्वये रचना केलेल्या सल्लागार समितीशी विचार विनिमय करून शासन आदेश क्र.कृषि व पदुम विभाग, मंत्रालय क्रमांक मत्स्यवि-१११५/प्र.क्र.१३७/पदुम-१४, दि.१ जुन २०१५ अन्वये **१ जुन ते ३१ जुलै (दोन्ही दिवस धरून)** राज्याच्या जलधी क्षेत्रात परवानाधारक बिगर-यंत्रचालित नौकास मासेमारीची मुभा दिलेली आहे. त्यानुषंगाने चालु वर्षीच्या दि. १ जुन २०२२ ते दि. ३१ जुलै २०२२ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी कालावधी लागु करण्यात येत असल्याबाबत या कार्यालयाच्या दि.०९/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,१९८१ च्या कायद्यामध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२१ निर्गमित करण्यात आलेला आहे. उक्त कायद्यातील कलम २ च्या खंड (ड) नुसार मासेमारी गलबताची व्याख्येमध्ये सुधारणा केलेली असुन (एक) बिगर-यंत्रचालित गलबत, (दोन) यंत्रचालित गलबत, आणि (तिन) यांत्रिक गलबत असे मासेमारी गलबताचे तिन प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले आहे. सदर वर्गीकरण लक्षात घेऊन या कार्यालयाच्या दि.०९/०५/२०२२ रोजीच्या आदेशामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

## शुध्दीपत्रक-

मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छीमारांचे जिवीत व वित्त यांचे रक्षण या हेतुने या वर्षी दि. १ जुन २०२२ ते दि. ३१ जुलै २०२२ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन १२ सागरी मैलापर्यंत) परवानाधारक बिगर-यंत्रचालित गलबत यांना मासेमारीची मुभा राहील, याची नोंद घ्यावी.

१. सदर पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचालित व यांत्रिक मासेमारी गलबत यांना लागु राहील.

Scanned with CamScanner

२. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचालित गलबत यांना लागु राहणार नाही.

**डॉ. अतुल पाटणे, (भा.प्र.से.)**
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव-**

१) प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.
२) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ ठाणे/ मुंबई उपनगर/ मुंबई शहर/ रायगड/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग
३) मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, सातपाटी/वसई/वर्सोवा/अलिबाग/रत्नागिरी/मालवण
४) उपनिंबंधक सहकारी (मत्स्य), आयुक्त कार्यालय, मुंबई.
५) सर्व परवाना अधिकारी

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. प्रधान सचिव (मत्स्य), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२) जिल्हाधिकारी, पालघर/ ठाणे /मुंबई उपनगर/ मुंबई शहर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग
३) विशेष पोलिस महानिरीक्षक (सुरक्षा व सागरी सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

Scanned with CamScanner